# कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

फोन नं.(02463) 257624 फॅक्स नं.(02463) 255777E- Mail codegloor@gmail.com


जा.क्र/न.पा/ **विद्युत विभाग**/ 2461 /2026 दिनांक:- 15 / 05 /2026

**प्रति,**

**मा.संपादक**

दै. देशोन्नती

..............................................

**विषय:- दिनांक 18/ 05 /2026 दैनिक वर्तमान पत्रात जाहीर ~~फेर~~ ई-निविदा सुचना प्रसिद्धी देणे बाबत.**

यादवारे आपणास कळविण्यात येते की, नगर परिषद कार्यालय देगलूर करीता सोबतचे जाहीर ~~फेर~~ ई-निविदा सूचना प्रसिद्धी कमीत कमी साईज मध्ये आपल्या वर्तमान पत्रात देण्यात यावी. सदर जाहीर ~~फेर~~ ई-निविदा सूचना प्रसिद्धीचे देय्यक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या (DGIPR) शासन मान्य यादीतील नमुद दराने या कार्यालयामार्फत देण्यात येतील. याची नोंद घ्यावी.तसेच कार्यालयास वर्तमानपत्राची प्रत उपलब्ध करून दयावी.

**सोबत:- जाहीर ~~फेर~~ ई-निविदा सूचना मजकूर.**

**मुख्याधिकारी**

**देगलूर नगर परिषद देगलूर**

# कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

फ़ोन नं.(02463) 257624 फॅक्स नं.(02463) 255777 E- Mail codegloor@gmail.com


जा.क्र/न.पा/**स्वच्छता विभाग**/ 2461 /2026 दिनांक:- 15 / 05 /2026

## जाहीर ई-निविदा सूचना

मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर जि. नांदेड यांनी 15 वा वित्त आयोग अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन कामासाठी वर्ष 2026-27 व 2027-28 (दोन वर्ष कालावधीसाठी) नोंदणीकृत योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराकडून सीलबंद लिफाफ्यात स्पर्धात्मक ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि.18/05/2026 ते दि.01/06/2026 पर्यंत मागविण्यात येत आहेत. सविस्तर जाहिरात, अटी-शर्ती इ. माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ई-निविदेच्या अटी शर्ती मध्ये बदल करणे प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी न.प. देगलूर यांनी राखून ठेवला आहे.

**मुख्याधिकारी**
**देगलर नगरपरिषद देगलूर**

| कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड |
|---|
| फोन नं.(02463) 257624 फॅक्स नं.(02463) 255777 E- Mail codegloor@gmail.com |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र/न.पा/**स्वच्छता विभाग/2461/2026** दिनांक:-**15/05/2026**

## ई-निविदा सूचना

देगलूर नगर परिषद देगलूर मार्फत खालील प्रकारच्या कामासाठी संबंधीत नोंदणीकृत, अधिकृत कंत्राटदार यांचे कडुन सन 2026-27 ते 2027-28 अशा 2 वर्षा करिता ई निविदा मागविण्यात येत आहेत. खालीला कामाची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे.

**निविदा कालावधी:- 24 महिने**

**निविदा अंदाजपत्रक रक्कमः 4,21,50,936/-**

कामाचे संक्षिप्त वर्णन

| अ. क्र | कामाचे स्वरूप | कोरी निविदा पत्राची किंमत | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | देगलूर शहरात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन करणे, विलगीकरण करणे, वाहतूक करणे, प्रक्रिया करणे व इतर अनुषंगिक कामे करणे (15 वा वित्त आयोग प्राप्त निधीतून) | 35000/- | 421509/- | 24 महीने |

**ई-निविदा ऑनलाईन प्रसिद्धीचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरण्याची सुरुवातीचा दिनांक | दि.**18/05/2026** |
| ई-निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरण्याची शेवटचा दिनांक | दि.**01/06/2026** |
| ई-निविदा उघडण्याच्या दिनांक | दि. 03/06/2026 |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | देगलूर नगरपरिषद देगलूर |
| कोरी निविदा किंमत | 35000/- |
| ई-निविदेसोबत भरावयाचा इसारा रक्कम | 421509/- |
| ऑनलाईन पेमेंट गेटवे वरून मुख्याधिकारी, नगर परिषद देगलूर या नावे स्वीकारली जाईल | |

**सूचना**

1. सर्व पंजीबध्द ठेकेदारांनी निविदा प्रपत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.
2. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेली निविदा दि. 03/06/2026 स. 11:00 वाजता. http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर जि.

नांदेड यांच्यां कार्यालयांत उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येईल. तरी सर्व संबंधीतांनी वेळेवर उपस्थित रहावे.

3. निविदेतील अटी व शर्ती तसेच विस्तृत नमुना शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.
4. निविदा धारकांनी निविदेसोबत निविदा फी व इसारा रक्कम संकेतस्थळावरील पेमेन्ट गेट वे द्वारे भरणा करण्यात यावी भरणा केलेल्या रक्कमेची प्राप्त झालेली पावती Upload करावी.
5. सदर कामाची ई निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषद देगलूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

**1. निविदे बाबत माहिती आणि अटी शर्ती:-**

1. न.प. च्या आर्थिक स्थिती नुसार व मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे 15 व्या वित्त आयोगातील निधी व उपयोगकर्ता शुल्क मधील उपलब्धतेप्रमाणे निर्गमित करण्यात येणारे प्रशासकीय मान्यतेच्या सर्व अटी बंधनकारक असतील.
2. निविदाधारकाने निविदेमध्ये असणाऱ्या प्रत्येक कामाचे दर online BOQ निविदा दरपत्रकामध्ये न.प. कार्यालयात दाखल करणे गरजेचे आहे. अपूर्ण निविदादरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
3. नगर परिषद विहित नमुन्यात व सर्व तपशिलासह प्राप्त निविदांचेच मूल्यमापन करेल.
4. सर्व इच्छुक कंत्राटदारांनी www.mahatender.gov.in या संकेस्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.
5. निविदा धारकाने निविदा संदर्भातील सर्व दस्तावेज ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील.
6. नियमानुसार शासनाच्या सर्व कराची (उदा. आयकर, वस्तू व सेवा कर, कामगार उपकर, कंत्राट विमा रॉयल्टी ईत्यादी) बिलातून कपात करण्यात येईल.
7. इसारा रक्कम भरण्यापासून सूट प्रमाणपत्र ग्राह्य राहणार नाही.
8. कंत्राटदारकडील कर्मचाऱ्यांचे शासनाच्या नियमानुसार कामगार विमा, प्रोव्हीडट फंड, इन्कम टॅक्स व इतर आवश्यक ते कर व निधी भरणेची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
9. किमान वेतन अधिनियम 1948 कायद्याचे अनुपालन करणे कंत्राटधारकास बंधनकारक राहील व त्या प्रमाणेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन करणे बंधनकारक राहील.
10. शासन नियमानुसार कामासाठी बालमजूर लावण्यात येवू नये
11. कंत्राटदारकडील कर्मचाऱ्यास नगरपरिषदकडे कायम स्वरूपी नोकरी मागण्याचा अधिकार राहणार नाही.
12. काम करतांना कंत्राटी कर्मचा-यास कोणताही अपघात, जीवित अथवा आर्थिक हानी झाल्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. तसे झाल्यास त्याची सर्वस्वी जबबादारी कंत्राटदाराची राहील.
13. कामासंबधी तंटा निर्माण झाल्यास सदर कामी नगरपरिषद जो निर्णय देईल तो अंतिम राहील व तो कंत्राटदारास मान्य राहील.
14. कंत्राटदारास न. प. च्या संमती शिवाय काम बंद करता येणार नाही. तसे केल्यास अनामत रक्कम जप्त करण्याचा तसेच ठेकेदारास ब्लॅक लिस्ट मध्ये टाकणेचा अधिकार नगरपरिषदेस राहील.
15. कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास केवळ देगलूर न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात दावा दाखल करावा लागेल.
16. किमान वेतन कायद्या नुसारचे दरापेक्षा कमी दर सादर केल्यास सदर निविदा अमान्य करण्यात येईल.
17. सदरचे काम करतेवेळी शासनाने दिलेला आदेश / निर्देश प्रमाणे सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहिल. किमान वेतन कायद्यानुसार अंमलबजावणी कंत्राटदारास करावी लागेल व कामगाराचे ईपीएफ भरणा केल्याची पावती सादर केल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.
18. उपरोक्त कामाला नगर परिषद अधिनियम कायद्यातील सर्व तरतूदी मंजुर निविदा धारकास बंधनकारक राहील.

19. सदर काम करताना आवश्यक संरक्षणात्मक उपाय योजना करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व न केल्यास होणा-या जिवित व वित्तहानीस कंत्राटदार जबाबदार राहील. सदर कंत्राट बाबत केव्हाही व कोणत्याही कायदेशीर प्रकारचा वाद निर्माण झाल्यास अशा वादामध्ये नगरपरिषद देगलूरचा निर्णय अंतिम राहील व तो कंत्राटदारास बंधनकारक राहील.
20. सदरील काम करतांना कोणत्याही प्रकारची अग्रिम रक्कम दिली जाणार नाही.
21. नियमानुसार शासनाच्या सर्व कराची बिलातून कपात करण्यात येईल.
22. सदर कामाबाबत लेखापरीक्षणात लेखाक्षेप आल्यास वसुलीपात्र रक्कम कंत्राटदारास स्वखर्चाने भरावे लागेल.
23. मंजूर झालेले निविदा दर हे कराराच्या कालावधीसाठी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील, त्यामध्ये कोणत्याही सबबीवर दरवाढ केली जाणार नाही.
24. निविदेमध्ये काहीही नमूद असले तरी कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषद देगलूर राखून ठेवीत आहे.

**2. निविदेबाबत आवश्यक बाबी :-**

1 निविदा फॉर्म फी व इसारा / बयाना रक्कम मुख्याधिकारी नगर परिषद देगलूर या नावाने ऑनलाईन पद्धतीन स्वीकारल्या जातील.

2 परिशिष्ट I प्रतिज्ञापत्र, निविदेबाबत सर्व अटी शर्ती मान्य असलेचे परिशिष्ट II मधील प्रमाणपत्र, कोणत्याही स्तरावर काळ्या यादीत नाव नसलेचे परिशिष्ट III मधील प्रमाणपत्र व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांशी कसल्याही पद्धतीने कामाशी संबंध नसलेचे प्रतिज्ञापत्र परिशिष्ट IV मधील प्रमाणपत्र स्वाक्षरी करून निविदेसोबत सादर करावेत.

3 संपूर्ण निविदाप्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सूचना, शुध्दीपत्रके इत्यादी माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

4 कंत्राटदारांनी निविदा खालील प्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने(TWO ENVELOP) निविदा ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

**3. आर्थिक लिफाफा (लिफाफा क्र. 02)**

कंत्राटदारानी आपले दरविहीत प्रपत्रात BOQ मध्ये योग्य त्या जागीभरून सदरचे प्रपत्र BOQ लिफाफा क्र.02 मध्ये अपलोड करावी. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या निविदेचेदर इतर कोठेही नमूद करण्यात येऊ नये.

**4. पूर्वअहर्ता - तांत्रिक बोलीचा लिफाफा क्रमांकः 1**

**निविदा लिफाफा क्र. 1 मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.**

1. निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम भरले बाबतची पावती.
2. Shop Act License/संस्थेचा नोंदणी दाखला.
3. पॅन कार्डची प्रत जोडणे बंधनकारक आहे.
4. EPF नोंदणी प्रमाणपत्र व सहा महिन्यांचे किमान 50 कामगारांचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी भरले बाबत ECR चलन सोबत जोडावे.

5. ESIC नोंदणी प्रमाणपत्र व सहा महिन्यांचे किमान 50 कामगारांचे कर्मचारी विमा भरले बाबत ESIC चलन सोबत जोडावे.
6. GST नोंदणी प्रमाणपत्र व चलन भरणा केलेली पावती सोबत जोडणे बंधनकारक असेल.
7. उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र (MSME).
8. पीटीआरसी (Professional Tax Registration) नोंदणी प्रमाणपत्र व चलन भरणा केलेली पावती सोबत जोडणे बंधनकारक असेल.
9. घनकचरा व्यवस्थापन कामासंबंधी ISO नोंदणी प्रमाणपत्र.
10. सन 2023-24,2024-25,2025-26 आर्थिक 3 वर्षाचे आयकर रिटर्न व balance sheet भरणा CA यांच्या UDIN नंबरसह सादर केल्याबाबतचे ताळेबंद अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.
11. मागील 1 वर्षाचे (2025-26) किमान उलाढाल 4 कोटी असल्याचे सी.ए. (C.A.) यांच्याकडुन प्रमाणित केलेले ताळेबंद अहवाल UDIN नंबरसह दाखल करणे बंधनकारक असेल.
12. नेट वर्थ प्रमाणपत्र ₹1 कोटी CA UDIN नंबरसह सादर करणे बंधनकारक असेल.
13. किमान 1 करोड रक्कमेची बँक सॉलव्हन्सी असणे आवश्यक आहे.
14. घनकचरा संबंधित कामे महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत किमान पाच ठिकाणी काम केल्याचा अनुभव प्रमाणपत्र किंवा कार्यादेश असणे बंधनकारक राहील.
15. कामगार सहा. आयुक्त यांचे लेबर लायसन्स किंवा नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.
16. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचे नोंदणी प्रमाणपत्र.
17. निविदाकर्त्याने ₹500 च्या स्टॅम्प पेपरवर स्वयंघोषणा सादर करणे आवश्यक आहे की कोणत्याही सरकारी किवा अर्धसरकारी संस्थेद्वारे ब्लॅकलिस्ट केलेले नाही.
18. निविदाकर्त्याने ₹500 च्या स्टॅम्प पेपरवर स्वयंघोषणा सादर करणे आवश्यक आहे की त्यांनी निविदेच्या अटी व नियमांचे पालन करण्यास मान्यता दिली आहे.
19. निविदाकर्त्याने ₹500 च्या स्टॅम्प पेपरवर स्वयंघोषणा सादर करणे आवश्यक आहे की निविदेसाठी सादर केलेले सर्व दस्तऐवज खरे आहेत.
20. निविदा सादर करण्यापूर्वी निविदाधारकाने नगर परिषदेमध्ये कामाच्या नियोजनाबाबतचा जीपीएस जिओ टॅग फोटो सह कृती आराखडा निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.
21. भागीदारी संस्था (Joint Venture) यांना निविदेमध्ये भाग घेता येणार नाही.
22. निविदेमध्ये काहीही नमूद असले तरी कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषद देगलूर राखून ठेवीत आहे.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

**सक्षम कंत्राटदार निवडण्याची कार्यपद्धत बाबत अटी व शर्ती**

सर्वपात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रणालीद्वारे निविदा दर सादर करावे. या संदर्भात सूचना मध्ये सर्व बाबी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**कंत्राटदाराची पात्रता ठरविण्याचे निकषः-**

1) नागरिकांना गुणात्मक व कार्यक्षम सेवा मिळण्यासाठी न.प. कडून नियुक्त केल्या जाणाऱ्या अभिकर्तेची पात्रता ठरविणे आवश्यक असल्यामुळे अभिकर्ता नागरिकांना कार्यक्षमतेने व तत्परतेने सेवा पुरवू शकतो अशी पात्रता धारण करणारा असावा, पात्रता ठरविण्याकरिता सर्व साधारणपणे पुढील निकष असतील.

i. आर्थिक क्षमता :- कंत्राटीची अमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबीवर गुंतवणूक करण्याची क्षमता

ii. अनुभव व पात्रता :- पूर्वानुभव व असे करार समाधानकारक पूर्ण केल्याबाबतचा तपशील कंत्राट अमलबजावणी साठी आवश्यक असलेले कुशल / अकुशल कर्मचारी वर्ग.

iii. नोंदणी व परवाने :- कंत्राटदार नोंदणीकृत व आवश्यक असलेले सर्व परवाना धारक असावा.

## कामाचे स्वरूप

**देगलूर नगर परिषदेच्या कंत्राटदार/गुत्तेदार/संस्था यांना खाली निश्चित केल्याप्रमाणे काम करावे लागेल.**

1) मंजूर निविदा दरपत्रकातील दर हे कंत्राटदारास नमूद कामाच्या कालावधी अखेर पर्यंत कायम राहतील.
2) न.प. च्या आर्थिक स्थिती नुसार व मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे 15 व्या वित्त आयोगातील निधी उपलब्धतेप्रमाणे वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे प्रशासकीय मान्यतेच्या सर्व अटी व मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडून येणारे सर्व आदेश बंधनकारक राहतील.
3) SOLID WASTE MANAGEMENT RULES-2016/2026 प्रमाणे व वेळोवेळी प्राप्त होणारे शासन निर्णयानुसार घनकचरा व्यवस्थापनाची ई. सर्व कामे करणे अनिवार्य असेल.
4) गुणात्मक व कार्यक्षम सेवा न पुरविल्यास किंवा मधेच काम सोडून दिल्यास किंवा मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडील प्रशासकीय मान्यता न मिळाल्यास अश्या प्रकारच्या कोणत्याही बाबीच्या अनुषंगाने दंड आकारण्याचा, कंत्राट रद्द करण्याचा किंवा नव्याने कंत्राट दिल्यास अतिरिक्त खर्चाची रक्कम दंडासहित वसूल करण्याचे अधिकार न.प.ला राहील. गुणात्मक व कार्यक्षम सेवा पुरविली किंवा नाही याबाबतचा अंतिम निर्णय मुख्याधिकारी यांचा राहील.
5) भागीदारी संस्था (Joint Venture) निविदेत भाग घेवू शकत नाहीत.
6) निविदेत खालील संस्था, प्रा.लि. कंपनी, कंत्राटदार भाग घेवू शकतात.

| अ.क्र. | निविदाकाराचा तपशील | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| अ. | एनजीओ संस्था, मित्रमंडळ, गणेश मंडळ, पब्लिक ट्रस्ट, फाउंडेशन अश्या संस्था असल्यास अटी व शर्ती मधील कागदपत्रासहित पुढील कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील | 1) धर्मादाय आयुक्ताकडील नोंदणी प्रमाणपत्र<br>2) घटनेचे किंवा उदिष्टेची प्रत (बायलॉज) जोडणे आवश्यक<br>3) मागील तीन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट धर्मादाय आयुक्तास सादर केलेली सर्टिफाईड प्रत जोडणे आवश्यक<br>4) सदरची निविदा भरणेबाबत संस्थेच्या सभासदांनी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव केलेल्या ठरावाची प्रत जोडणे आवश्यक<br>5) निविदा भरणेकामी त्यावरसह्या करणे कामी व टेंडर बाबतचे सर्व निर्णय घेणे बाबतचे अधिकार देणे बाबतचा ठराव जोडणे आवश्यक<br>6) संस्थेचे पॅन कार्ड जोडणे आवश्यक |
| ब | सहकारी मजूर संस्था, बेरोजगार संस्था सोसायटी अशा संस्था असल्यास वरील अटी व शर्ती मधील कागदपत्रासहित जोडणे बंधनकारक | उप निबंधकाकडील नोंदणी दाखला जोडणे आवश्यक<br>सह निबंधकाचा वर्गीकरणाचा दाखला (दर्जाबाबाताचा) जोडणे आवश्यक<br>घटनेचे किंवा उद्दिष्टेचे प्रत (बायलॉज) जोडणे आवश्यक<br>मागील 3 वर्षाचे ऑडिट रिपोर्ट उप निबंधकाकडे सदर केलेली सर्टीफाईड प्रत जोडणे आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | | सदरची निविदा भरणे बाबतची संस्थेच्या सभासदांनी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव केलेल्या ठरावाचीप्रत जोडणे आवश्यक<br>निविदा भरणेकामी त्यावरसह्या करणे कामी व टेंडर बाबतचे सर्व निर्णय घेणे बाबतचे अधिकार देणे बाबतचा ठराव जोडणे आवश्यक<br>संस्थेचे पॅन कार्ड जोडणे आवश्यक |
| क | प्रा.लि. कंपनी अशा संस्था असल्यास वरील अटी व शर्ती मधील कागदपत्रांसाहित खालील कागदपत्रासहित जोडणे बंधनकारक | 1) मुंबई दुकाने अधिनियम 1948 अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक<br>2) कंपनी रजीस्ट्रेशन अॅक्ट जोडणे आवश्यक<br>3) कंपनी मेमोरेडम जोडणे आवश्यक<br>4) कंपनी पॅन कार्ड जोडणे आवश्यक EPF, PTR, PTE प्रमाणपत्र व परतावे |
| ड | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत नोंदणीकृत असल्यास वरील अटी व शर्तीमधील कागदपत्रासहीत जोडणे बंधनकारक आहे | 1) नोंदणी प्रमाणपत्र<br>2) मागील तीन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट व आयकर परतावेचे प्रमाणपत्र<br>3) कंपनी पॅन कार्ड जोडणे आवश्यक<br>4) जी.एस.टी. प्रमाणपत्र व परतावे<br>5) EPF, PTR, PTE प्रमाणपत्र व परतावे<br>6) Technical Staff details |
| इ | Proprietorship/ firm अशा संस्था असल्यास वरील अटी व शर्ती मधील कागदपत्रांसाहित खालील कागदपत्रासहित जोडणे बंधनकारक | 1) Shop act License<br>2) MSME Reg. प्रमाणपत्र<br>3) EPF, ESIC<br>4) PTRC, PTEC<br>5) GST प्रमाणपत्र<br>6) पॅन कार्ड<br>7) मागील तीन वर्षाचे ITR व बॅलेंस सिट रिपोर्ट |

**निविदेबाबत अटी व शर्ती**

1. देगलूर नगर परिषद क्षेत्रातील निर्माण होणारा दैनंदिन घनकचरा घरोघरी जाऊन ओला/सुका/प्लास्टिक/घातक या प्रमाणे नागरिकाकडून विलगीकृत कचरा संकलित करणे व विलगीकरण केलेला घनकचरा नजीकच्या केंद्रावर वाहतूक करून त्यावर शास्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे. यासाठी सर्व वाहनांचे महिन्यातून एकदा वजनाच्या पावती व दररोजचे लॉगबुक तयार करून दर महिन्याला न.प. कडे देणे बंधनकारक राहील.
2. SWM Reduce, Recycle & Reuse प्रणाली संबंधी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक राहील.
3. वाणिज्य भागात दिवसातून न.प. मार्फत बसविण्यात आलेले डस्टबिन दैनदिन रित्या स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील.

4. शहरातील नागरिकांच्या call अथवा लेखी सूचनेनुसार C&D waste उचलून निश्चित केलेल्या ठिकाणी वाहतूक करून लँडफिलिंग, सपाटीकरण करणे आवश्यक राहील, तसेच C&D waste चे पुनःवापर करणे बंधनकारक राहील.
5. सदर कामासाठी (स्त्री / पुरुष) आवश्यक कामगार अतिरिक्त मनुष्यबळ पुरवठा करणे, त्यांचे वेतन / भत्ते देणे, त्यांचे गणवेश, सुरक्षेसंबंधी उपाययोजना, गट विमा योजना, वैदकीय मदत. ई.पी.एफ.भरणे ई.ची जबाबदारी निविदाधारकाची राहील, याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्याचे निवारण करणे भरपाई करणे याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील, याबाबत नगर परिषद देगलूर जबाबदार राहणार नाही.
6. बाह्यस्रोत द्वारे वापरण्यात येणारे सर्व स्त्री / पुरुष कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन, भत्ते प्रदान करणेची व EPF संबंधी principal employer share भरणा करणेची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल.
7. न.प क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाची कामे करणेसाठी उपरोक्त नमूद प्रमाणे न.प. कडील वाहने निविदाधारकास उपलब्ध करून देण्यात येतील. वाहने चालविणे साठी ड्रायव्हर, वाहन चालकाचा लायसन्स नूतनीकरण असणे आवश्यक आहे, कचरा वाहतुक बंदीस्त पद्धतीने करणे आवश्यक आहे, वाहन लोडिंग / अनलोडिंग करणेसाठी कामगार उपलब्ध करणे, वाहनाची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे, वाहनास वेळेवर इंधन पुरवठा करणे, वाहने / कंटेनर स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे, दैनंदिन मेंटेनन्स करणे, दर महिन्यास सर्विसिंग करून त्याचा लेखी अहवाल सादर करणे ई.ची जबाबदारी निविदाधारकाची असेल. घंटागाडी 3 दिवसा पेक्षा जास्त बंद राहिल्यास प्रति दिन 1000 रु प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
8. निविदाधारकास घंटागाडी वर जी.पी.एस. प्रणाली/RFID system लावणे व त्यांचे दैनदिन vehicle tracking system रिपोर्ट, दैनदिन लॉगबुक न.प.कडे सादर करणे अनिवार्य राहील.
9. सर्व कामगारांना fluorescent jacket, गणवेश, गमबूट, मास्क, ओळखपत्र ई. ची सोय करणे आवश्यक राहील.
10. न.प.ने उपलब्ध करून दिलेले वाहन, साहित्य या खेरीज ईतर सर्व साहित्य उपलब्ध करून देणेची जबाबदारी निविदाधारकाची असेल.
11. सर्व शासकीय नियम, अटी, कर भरणा ई. चे पालन करणे निविदाधारकास बंधनकारक असेल.
12. आपलेकडील कामगार यांची दैनदिन उपस्थिती ठेवणे व नगर परिषद मागणी करेल तेंव्हा सादर करणे आवश्यक राहील.
13. उद्यानातील, गृहनिर्माण सोसायटी व भाजीमार्केट ठिकाणचे कचरा जागेवर प्रक्रिया करणेचे नियोजित आहे त्यानुसार वर्गीकृत फक्त ओला कचरा सदर केंद्रावर वेळोवेळी उपलब्ध करून देणेची जबाबदारी निविदाधारकाची असेल. तसेच ओला कचरा केंद्रावर हस्तांतरित करणे संबंधी आवश्यक सर्व उपाययोजना करणे आवश्यक राहील.

14. प्रतिमाह शाळा, महाविद्यालये, शहरातील वार्ड, झोपडपट्टी ई. सार्वजनिक ठिकाणी घनकच-याची शात्रीय पद्धतीने विल्हेवाट / वर्गीकरण करणे संबंधी जनजागृती करणे आवश्यक राहील.

15.संकलन वाहनावर बॅनरिंग, Audio jingle, supervisor मार्फत कॉर्नर बैठका ई. जन जागृती करणे गृहनिर्माण सो., भाजी मार्केट, खत निर्मिती प्रकल्प व ट्रान्सफर स्टेशन ठिकाणी जनजागृती करणे आवश्यक राहील. तसेच सदरील कामाचे geotagged photograph न.प. कडे सादर करणे बंधनकारक राहील.

16.Meat / Fish market ठिकाणचे वेस्ट संकलित करून Treatment Facility ठिकाणी हस्तांतरित करणे आवश्यक राहील.

17.दैनदिन विलगीकरण कचरा संकलन, विलगीकरण नंतर वाहतूक होणारा ओला, सुका, घातक कचऱ्याचे किमान महिन्यातून एकदा वजन करून वजनाच्या पावत्या न.प. कडे जमा करणे आवश्यक राहील. तसेच ओला सुका, घातक वर्गवारी नुसार वजनाचा तपशील एकत्रित दर महिनाअखेर न.प. कडे सादर करणे आवश्यक राहील.

18.न.प. च्या मालकीचे weigh bridge / system तयार होई पर्यंत कचऱ्याचे वजन करणेसाठी लागणारा खर्च निविदाधारकाचा असेल. जेंव्हा न.प. च्या मालकीचे weigh bridge / system तयार होईल त्यावेळी कचऱ्याचे वजना साठी निविदाधारकास बाजारभावाच्या तुलनेत सवलतीच्या दरात वजन करून मिळणेसाठी स्वतंत्र कळविले जाईल.

19.इतरत्र ठिकाणी आढळलेले बायोमेडिकल वेस्ट एकत्रित करून न.प. मार्फत वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देशाप्रमाणे विल्हेवाट करावे लागेल. तसेच यासंबंधी सविस्तर लॉगबुक दर महिन्याला न.प. कडे सादर करणे आवश्यक राहील.

20. Swachhta App द्वारे व दूरध्वनीवर, लेखी अर्ज / तक्रार द्वारे नागरिकांच्या तक्रारीची नोंद घेऊन त्यांचे निरांकरण निविदाधारकाने करणे आवश्यक राहील. यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचे लॉगबुक न.प. कडे सादर करणे बंधनकारक राहील.

21.रहिवासी / वाणिज्य /मिश्र भागातील दैनदिन घरातला / दुकानातला कचरा संकलित केला गेला नाही अशी तक्रार आल्यास रु. 1000/- प्रति घर प्रति दिवस या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

22.कामाच्या वेळी सफाई कामगार यांनी PPE चा वापर न केल्यास रु. 100/- प्रति कामगार प्रति दिवस या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

23.दैनदिन संकलित केलेल्या ओला कचऱ्याचे composting न केल्यास रु. 1000/- प्रति दिवस या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

24.उपरोक्त प्रमाणे दंडाची आकारणी करणेसंबंधी खालील प्रमाणे तपासणी अहवाल प्राप्त झालेप्रमाणे देय्यकाची प्रदाने करण्यात येतील.

**दैनंदिन स्तरावर तपासणी -** नेमून देण्यात आलेले स्वच्छता निरीक्षक यांचे मार्फत सर्व शहरातील उपरोक्त प्रमाणे कामे केले संबंधी व दंडाची आकारणी संबंधी दैनंदिन अहवालानुसार.

**आठवडा स्तरावर तपासणी** - न.प.चे स्वच्छता विभाग प्रमुख/स्वच्छता अभियंता यांचे मार्फत शहरातील Sampling प्रमाणे पाहणी करण्यात आलेले अहवालानुसार. **दरमाह स्तरावर तपासणी** - न.प.चे स्वच्छता विभाग प्रमुख यांचे मार्फत सर्व शहरातील उपरोक्त प्रमाणे कामे केले संबंधी व दंडाची आकारणी संबंधी दरमहिन्याला एक वेळेस सादर करण्यात आलेले अहवालानुसार.

25. निविदाधारकास गरज असल्यास रॅग पिकर असोसीयेशन, इतर सामाजिक संघटना ई. यांच्या मदतीने कामे करणे, नागरिकांमध्ये प्रबोधन करणेस मुभा देण्यात येईल.
26. घंटागाडीतील कचरा झाकून नेणे बंधनकारक राहील. घंटागाडीची स्वच्छता ठेवणे आवश्यक राहील.
27. निविदा धारकास कामाचा दैनदिन अहवाल (daily activity report) स्वच्छता निरीक्षक कडे दररोज सादर करणे आवश्यक राहील.
28. SWM Rule Plastic waste management Rule 2016/2026 Environment protection act व इतर संबंधित अधिनियम व कायद्याचे पालन होणे आवश्यक आहे, कोणतेही उल्लंघन न होणे याची दक्षता घेणे आवश्यक राहील.
29. न.प. मार्फत वेळोवेळी राबविण्यात येणारे स्वच्छता मोहीम, अतिक्रमण मोहीम, कार्यक्रम उदा. गणेश विसर्जन, दुर्गा विसर्जन, विविध सण/समारंभ, महापुरुषांच्या जयंत्या, माझी वसुंधरा 7.0, ई. साठी निविदाधारकाने आवश्यक मनुष्यबळ पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच अतिरिक्त कामाच्या वेळी देखील मनुष्य बळ पुरवठा करावा लागेल.
30. भविष्य निर्वाहनिधी कायदा 1952 चा परवाना असणे आवश्यक राहील. दर महिन्यास बाह्यस्रोत पद्धतीने पुरवठा करण्यात आलेल्या कामगारांचे ई.पी.एफ. भरणा केलेले पुरावे दाखल करणे बंधनकारक राहील.
31. सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.
32. बॅंक सॉलव्हन्सी किमान रु. 50 लक्ष असले बाबतचे प्रमाणपत्र जोडावे.
33. राज्य कामगार विमा अधिनियम 1948 चा परवाना असणे आवश्यक राहील.
34. गुत्तेदार / संस्था त्याचे कोणतेही कामगार यांना झालेला कोणताही अपघात, जिवीत वित्त हानी तो कोणत्याही कारणाने (नैसिर्गक मानव निर्मीत तांत्रीक भौतिक कोणताही ) असली तरी त्याची जबाबादारी नगर परिषद देगलूर यांची असणार नाही त्यास गुत्तेदार / संस्था वैयक्तीकरित्या जबाबदार राहील.
35. कामगार विषयक (भविष्य निर्वाह निधी, बालकामगार प्रतीबंध कायदा, वेठबिगार प्रतीबंधक कायदा) सर्व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी गुत्तेदार /संस्था यांची राहील नगर परिषद देगलूर यास जवाबदार राहणार नाही.

36.कोणताही न्यायालयीन वाद उदभवल्यास केवळ देगलूर न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात दावा दाखल करावा लागेल.

37.गुत्तेदाराच्या दैनंदिन कामा बाबत नागरीक, स. सदस्य यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास कचरा संकलन, वाहतूक प्रक्रिया ई. निविदेतील नमूद सर्व कामे समाधानकारक न झाल्यास, प्रशासकीय मान्यता संपुष्टात आल्यास कोणतेही कारण न देता विहित मुदतीपूर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार न.प. ने राखून ठेवले आहेत. या बाबत मा. न्यायालयात कोणतीही दाद मागता येणार नाही.

38.कंत्राटी कामगार पध्दतीने नियमन आणि ती नाहीशी करणे बाबत अधिनियम 1970 नुसार परवाना असणे आवश्यक असून या अधिनियमातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना देय असणारे वेतन, भत्ते व इतर अनुज्ञेय लाभ देणे बंधनकारक राहील, याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची असेल.

39.कार्यादेश प्राप्त करणे पूर्वी शासन नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्कावर करारनामा करून देणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

40.प्रथम देय्यकापूर्वी निविदाधिन कामाचे कामगार विमा काढून न.प. कडे सादर करणे बंधनकारक राहील अथवा प्रथम देय्यकातून एकूण कामाच्या किंमतीचे 1% प्रमाणे कपाती केले जातील व शासनास कामगार विमा न.प. मार्फत भरण्यात येईल.

41.निविदेतील कामाचे दर हे दरमाह प्रमाणे online BOQ मध्ये सादर करतेवेळी सर्व बाबी विचारात घेवून सादर करावेत.

42.ICT Based कचरा संकलन प्रणालीच्या अहवालानुसार देयक अदा केले जाईल. ती प्रणाली वापर करणे बंधनकारक राहील.

43.शहरातील रॅग पिकर / कचरावेचक यांचेकडून वर्गीकृत सुका कचरा स्क्रॅपडीलर कडे किती प्रमाणात विकला जातो त्याची आकडेवारी सादर करणे अनिवार्य राहील.

44.देगलूर शहर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालानुसार नियोजित स्थापत्य कामे सद्यस्थितीत उपलब्ध infrastructure प्रमाणे प्रक्रिया / पुनःवापर केंद्राच्या ठिकाणी दैनदिन कामे चालू ठेवणे व आवश्यकतेप्रमाणे मशिनरी, शेड उभारणी, MRF ई. कामे करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

45.देगलूर शहर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालानुसार नियोजित स्थापत्य कामे त्यातील प्रोसेसिंग शेड, टिपिंग एरिया, स्टोरेज ई. उपांगाचा विनियोग करणे, दैनंदिन मेंटेन करणे व आवश्यक उपाययोजना करणेसाठी न.प. निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

46.ओला कचऱ्यावर (Pit composting/ vermi composting / windrow composting ई. शास्त्रोक्त पद्धतीद्वारे) प्रक्रिया करून महिना अखेर तयार झालेले खताचे अंतिम वजन करून न.प.कडे खत हस्तांतरित करणे, भाजी मार्केट / उद्यान येथील ओला कचऱ्याचे कम्पोस्टिंग झालेले खत न.प. कडे हस्तांतरित कराणे, सुका कचऱ्याचे विविध वर्गीकरणनुसार जमा केलेले वर्गीकृत साहित्य विक्रीचे अधिकार न.प. चे असतील व C&D waste संबंधी

वर्गीकृत साहित्य चे पुनः वापर करणे व भूभराव ई. चे छायाचित्र, न.प. कडे सादर करणे बंधनकारक राहील.

47. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांकः स्वमअ-2017/प्र.क्र..53/नवि-34 दिनांकः 29 एप्रिल 2017 नुसार कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून तयार होणाऱ्या सेंद्रिय खताची विपणन व विक्री करण्यासाठी "हरित महासिटी कंपोस्ट" शासनमान्य ब्रँड मिळविणे व त्यासाठी आवश्यक ते परीक्षण करणे आवश्यक राहील.

48. ओला कचऱ्याचे खत निर्मिती संबंधी आवश्यक बायोकल्चर, गांडूळ, ईतर रासायनिक साहित्य, मशिनरी ई पुरवठा करणे व दैनंदिन वापरात ठेवणे साठी आवश्यक सर्व खर्चाची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल. सदर निर्मित होणारे खताचे पॅकिंग न.प. मार्फत करण्यात येईल.

49. सुका कचऱ्यावर प्रक्रिया / पुनः वापर संबंधी आवश्यक मशिनरी, आवश्यक साहित्य ई. पुरवठा करणे व दैनंदिन वापरात ठेवणे साठी आवश्यक सर्व खर्चाची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल.

50. तसेच बाह्यस्रोत कामगारांचे भविष्य निर्वाह निधीची वर्गणी जमा केले संबंधी चलन न.प. कडे दर महिन्याला सादर करावे लागेल.

51. मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नांदेड यांचे तांत्रिक मान्यता जा.क्र. मजिप्रामंनां/तांशा-/458/2026 दि.29/04/2026 व मा. जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता आदेश **क्र.2026/नपाप्र/टे-02/15 वा वित्त आयोग/देगलूर/प्र.मा./सिआर-147 दिनांक 12.05.2026** मधील लागू असेल त्याप्रमाणे अटी बंधनकारक असतील, अन्यथा आपले काम रद्द करून आपणास काळ्या यादीत टाकले जाईल.

Kamble

**मुख्याधिकारी**
**देगलर नगरपरिषद देगलूर**

**परिशिष्ट II**

**(रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर)**

मी श्री / श्रीमती ---------------------------------------------------------------------------रा.------------

------ ------ ------ ------ ------ ------ ------ देगलूर नगर परिषद देगलूर स्वच्छता विभागासाठी करीता **देगलूर शहरात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन करणे, विलगीकरण करणे, वाहतूक करणे, प्रक्रिया करणे व इतर अनुषंगिक कामे करणे 15 वा वित्त आयोग प्राप्त निधीतून काम करणे** बाबतच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून सर्व अटी मान्य आहेत.

स्थळ :-

दिनांक :-

निविदाधारकाची स्वाक्षरी

नाव :-

पत्ता :-

**परिशिष्ट III**

**(रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर)**

मी श्री. -------------------------------------------------------- शपथपूर्वक लेखी देतो की,

माझे /

संस्थेचे कोणत्याही स्तरावर, काळ्या यादीत नाव नाही.

स्थळ :- देगलूर

दिनांक :-

निविदाधारकाची स्वाक्षरी

नाव :-

पत्ता :-

## परिशिष्ट IV

## प्रतिज्ञापत्र

**(रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर)**

मी / आम्ही याद्वारे असे नमूद करतो की. महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (आय) व कलम ४४(१)(व) मधील तरतुदीच्या, ज्या खालील उदध्रत केलेल्या आहेत, माहिती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगर पालिकेशी किंवा नगर पालिकेच्या अधीन किंवा नगर पालिकेने किंवा नगर पालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगर सेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागेदारी नाही.

कलम १६(१) (आय) :- यापुढे तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधीन किया नगरपालिकेने किया नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किया आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

कलम ४४(१) (व) :- पालिका सदस्य म्हणून किंवा नगर पालिकेच्या कोणत्याही समितीया सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बबतीत कलम १६ चे पोट कलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किया हितसंबंध असेल मग अशा हिस्साची किंवा हितसंबंधाची किमत काहीही असो किवा जीत त्याचा अशीलाच्या, प्रकल्पाच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिक दृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

**निविदाधारकाचे नांव :-**

**पत्ता:-**

**दिनांक :-**

**निविदावारकाची सही**

**साक्षीदाराचे नांव :-**

**पत्ता :-**

**साक्षीदाराची सही**

**दिनांक :-**

**परिशिष्ट ।**

नमुद प्रतिज्ञापत्र (रु 100/- च्या स्टॅप पेपरवर)

प्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी ..............................................................वय वर्ष ....... राहणार ......................... या प्रतिज्ञा पत्राव्दारे लिहुन देतो की, मी ..............................................................या फर्मचा/कंपनीचा मालक असुन ...............................या कामासाठी निविदा सादर करीत आहे. त्या निविदाच्या लिफाफा क्र.1 मध्ये कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी, बरोबर व पुर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असुन असे शपथपुर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी व तसेच अपुर्ण माहीती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

1. जर कंत्राट कालावधीदरम्यान, मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचाऱ्यांनी नगर परिषेदेला कोणतीही खोटी  माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी /बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
2. जर कंत्राट कालावधीदरम्यानआणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे  खोटी /बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
3. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

**कंत्राटदार सही /शिक्का**

Signature Not Verified

Digitally signed by DEBADWAR SUNIT SURESHRAO
Date: 2026.05.18 06:43:31 IST
Location: Maharashtra-MH